**रब्बी २०१०-११ ते उन्हाळी २०१२-१३ या कालावधीसाठी राज्यातील सिंचनासाठी क्षेत्राधारित पिकनिहाय पाणीपट्टीचे दर व औद्योगिक, घरगुती आणि कृषी सिंचनाच्या वापरकर्त्यासाठी घनमापन पध्दतीने पुरवावयाच्या पाणीपट्टीचे दर.**

**महाराष्ट्र शासन**
**जलसंपदा विभाग**
**मंत्रालय, मुंबई - ४०००३२**
**शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०१०/४०७/१०/सिंव्य (धोरण )**
**दि. २९ जुन, २०११**

**संदर्भ**:-महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांचे आदेश क्र.मजनिप्रा२०११/ठोक जलदर-आदेश/(५९)/३१५, दिनांक ३० मे,२०११

**प्रस्तावना** :-

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५, मधील कलम ११ (प ) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून, राज्यातील औद्योगिक, घरगुती कृषी- सिंचन या तीन प्रवर्गातील ठोक जल वापरकर्त्यांसाठी अधिनियमाच्या कलम ११(घ) मधील तरतुदीत विहित केलेल्या पद्धतीनुसार प्रथमतः निकष निर्धारीत करून प्राधिकरणाने ठोक जलदर पुनर्विलोकित व सुधारित केले आहेत. या तीन प्रवर्गातील वापरकर्त्यांसाठी रब्बी २०१०-११ ते उन्हाळी २०१२-१३ या कालावधीकरीता घनमापन दर महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने संदर्भाधिन आदेशान्वये दिनांक ३० मे,२०११ रोजी स्वतंत्रपणे निर्गमित केले आहेत. सोबत प्रत जोडली आहे.

**शासन निर्णय:-**

**( अ ) <u>सिंचनासाठी क्षेत्रधारित पाणीपट्टीचे दर</u>**

**१.०** ठोक जलदर निर्धारणाच्या निकषातील कलम ६.४ नुसार कृषी-सिंचनासाठी क्षेत्राधारीत पाणीपट्टीचे आदेश निर्गमित करण्याबाबत प्राधिकरणाने पत्र दि.३० मे २०११ अन्वये जलसंपदा विभागास निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार कृषी-सिंचनासाठी क्षेत्राधारित जलदर (पाणीपट्टी) खालीलप्रमाणे राहतील.

**२.०** प्रस्तुत दर रब्बी हंगाम २०१०-११ पासून अंमलात येतील व ते उन्हाळी हंगाम २०१२-१३ पर्यंत वैध रहातील.

३.० पीकनिहाय, हंगाम निहाय क्षेत्राधारित मंजूर पाणीपट्टीचे दर रु. प्रति हेक्टर **परिशिष्ट- १** मध्ये दर्शविल्यानुसार असतील.

४.० खाजगी उपसासिंचन योजनांसाठी, पाणीपुरवठ्याच्या स्त्रोतावर आधारीत मंजूर पाणीपट्टीचे दर रु. प्रति हेक्टर **परिशिष्ट- २** मध्ये दर्शविल्यानुसार असतील.

५.० शासकीय उपसासिंचन योजनांसाठी योजनानिहाय क्षेत्राधारित दर **परिशिष्ट-१** प्रमाणे असतील. उर्जा वापराप्रीत्यर्थ प्रदान करावयाचे शुल्क **अंतिम निकषाच्या परिशिष्ट-२ ब** मध्ये विहित केलेल्या पद्धतीनुसार ठरविण्यात यावे.(प्रत सोबत जोडली आहे )

६.० सर्व दर स्थानिक उपकरांव्यतिरिक्त आहेत. शासनाकडून वेळोवेळी निश्चित केल्यानुसार स्थानिक उपकर सुध्दा देय असेल.

७.० सर्व प्रकारच्या जलसंपत्ती प्रकल्पांना हे दर लागू रहातील. प्रकल्पाचे प्रचालनाच्या प्रथम वर्षी कोणतेही जलदर आकारले जाणार नाहीत.

८.० **<u>हंगाम कालावधी</u>**

(i) जलदर आकारणीकरीता कोकण, विदर्भ व उर्वरित राज्यातील तीनही हंगामांचा कालावधी खालीलप्रमाणे राहील.

| **हंगाम** | **कालावधी (कोकण व विदर्भाव्यतिरिक्त )** | **कालावधी ( कोकण व विदर्भासाठी)** |
|---|---|---|
| खरीप | १ जुलै ते १४ ऑक्टोबर | १ जुलै ते १४ नोव्हेंबर |
| रब्बी | १५ ऑक्टोबर ते २८ फेब्रुवारी | १५ नोव्हेंबर ते ३१ मार्च |
| उन्हाळी | १ मार्च ते ३० जून | १ एप्रिल ते ३० जून |

(ii) दोन पेक्षा जास्त पाळयांद्वारे पाणी घेण्यात आले असल्यास त्या हंगामासाठी पूर्ण दराने आकारणी केली जाईल. प्रत्येक पाणी पाळीस एक चतुर्थांश अनुज्ञेय दरानुसार दोन पाणी पाळयांपर्यंत आकारणी केली जाईल. मंजूर ब्लॉक करिता पाळया विचारात न घेता पूर्ण हंगामी दराने आकारणी केली जाईल.

९.० **<u>सुट /सवलती / प्रोत्साहने</u>**

कालवे, शासकीय उपसासिंचन योजना व खाजगी उपसासिंचन योजनांमधून सर्व क्षेत्राधारीत पाणी पुरवठ्यासाठी सुधारित दराने आकारणी करतांना खालील सवलती लागू राहातील.

| | |
|---|---|
| (i) २ हेक्टर पेक्षा कमी भूधारक शेतकरी | ऊस, केळी व फळबागा या व्यतिरिक्त सर्व पिकांसाठी अनुज्ञेय दराच्या ७५ टक्के दर |
| (ii) ४ हेक्टरपेक्षा कमी भूधारक शेतकरी : (अ) मा. पंतप्रधान पॅकेज मधील विदर्भातील जिल्हे व (ब) राज्यशासनाने जाहीर केलेले नक्षलग्रस्त जिल्हे | ऊस, केळी व फळबागा या व्यतिरिक्त सर्व पिकांसाठी अनुज्ञेय दराच्या ५० टक्के दर |
| (iii) विदर्भातील कराराअंतर्गत भाताचे क्षेत्र | अनुज्ञेय दराच्या ५० टक्के दर |
| (iv) प्रकल्पबाधित शेतकरी | सर्व पिकांसाठी अनुज्ञेय दराच्या ७५ टक्के दर |
| (v) आदिवासी उपयोजने अंतर्गत अंमलात आणलेल्या सर्व प्रकल्पातील आदिवासी शेतकरी | दर आकारणी करण्यात येणार नाही. |
| (vi) फळबागाच्या पिकांसाठी त्यापुढे नमूद केलेल्या सुरुवातीच्या वाढीच्या कालावधीसाठी अनुज्ञेय दराच्या २५ टक्के दराने आकारणी करण्यात येईल. | द्राक्षे - ३ वर्षे<br>संत्री - ४ वर्षे<br>आंबा/नारळ/आवळा/ चिंच/चिक्कू } - ५ वर्षे |
| टीप- सदर कालावधीत आंतर पीक घेतले तर त्या आंतर पिकासाठी अनुज्ञेय दराने आकारणी करण्यात येईल व फळबाग पिकासाठी स्वतंत्र आकारणी केली जाणार नाही. | |
| (vii) सिंचनाच्या आधुनिक पद्धतीचा (सूक्ष्म सिंचन) अवलंब केला असेल तर | अनुज्ञेय दराच्या ७५ टक्के दर |
| टीप- वरील (vi) मध्ये उल्लेखिलेल्या फळबाग पिकासाठी सुरुवातीच्या वाढीच्या कालावधीनंतर जेव्हा पूर्ण दराने अदायगी केली जाईल तेव्हा ही सवलत लागू होईल. | |
| (vii) हंगाम सुरु होण्यापूर्वी आगाऊ अदायगी केली असेल तर | जलदरात ५ टक्के सूट दिली जाईल. |
| (ix)मालगुजारी तलावाखालील क्षेत्रासाठी | प्रचलित पध्दत पुढे चालू राहील. |

## १०.० <u>दंडात्मक तरतुदी</u>

(i) दोन पेक्षा अधिक मुले असलेल्या शेतक-यास महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम (२००५) लागू झाल्यापासून एक वर्षानंतर (म्हणजेच दि. ८/६/२००६ नंतर) मूल झाले असेल तर अनुज्ञेय दराच्या १.५ पट दर आकारण्यात येईल.

(ii) अनुज्ञेय कालावधी नंतरच्या विलंबाने केलेल्या अदायगीकरीता आकारणी केलेल्या पाणीपट्टीवर अथवा त्याच्या हिश्श्यावर दरमहा १ टक्का दंडात्मक दर आकारला जाईल.

**(ब) औद्योगिक, घरगुती आणि कृषी सिंचनाच्या वापरकर्त्यासाठी घनपामन पध्दतीने पुरवावयाच्या पाणीपट्टीचे दर.**

रब्बी २०१०-११ ते उन्हाळी २०१२-१३ या कालावधी करिता औद्योगिक,घरगुती आणि कृषी सिंचनाच्या वापरकर्त्यासाठी घनमापन पध्दतीने पुरवावयाच्या पाणीपट्टीचे दर हे संदर्भाधिन महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या आदेश दि. ३०/५/२०११ **अनुक्रमांक ४- ठोक पाणी वापराचे घनमापन दर** मध्ये दर्शविल्यानुसार असतील.सोबत प्रत जोडली आहे.

११.० हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०११०६२९१६५५०२००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(सं. दे. कुलकर्णी)
शासनाचे उप सचिव.

**सोबतः- वरील प्रमाणे**

प्रति,
मा. राज्यपालांचे सचिव.
मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव.
मा. उपमुख्यमंत्र्यांचे सचिव.
सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव.
सर्व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,मुंबई ३२
वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई ३२
नियोजन विभाग, ,मंत्रालय,मुंबई ३२
महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई ३२
नगर विकास विभाग, मंत्रालय,मुंबई ३२
ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय,मुंबई ३२
उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय,मुंबई ३२

कृषी व पशुसंवर्धन,दुग्ध विकास व्यवसाय व मत्स्य व्यवसाय (कृषी )विभाग ,मंत्रालय,मुंबई
सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग,मंत्रालय,मुंबई ३२
सार्वजनिक बांधमाक विभाग ,मंत्रालय,मुंबई ३२
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल (लेखापरिक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
महालेखापाल (लेखापरिक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.
सचिव, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई.
मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
मंत्रालयातील इतर विभाग.
सचिव (जलसंपदा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव  जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
सर्व कार्यकारी संचालक, जलसंपदा विभाग.
सर्व महासंचालक, जलसंपदा विभाग.
विशेष कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई.
सर्व मुख्य अभियंता व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग.
मुख्य अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई.
मुख्य अभियंता, महाराष्ट्र जिवन प्राधिकरण, मुंबई.
सर्व उपसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
सर्व अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग.
सर्व अवर सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
सर्व कक्ष अधिकारी, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवडनस्ती कार्यासन सिंव्यधोरण.

## परिशिष्ट-१ पीकनिहाय, हंगामनिहाय क्षेत्राधारित दर (रुपये / हेक्टर )

| अ. क्र. | पिके | सुधारीत दर | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | | खरीप | रब्बी | उन्हाळी | |
| | **खरीप** | | | | |
| १. | अन्नधान्य व इतर खरीप | २४० | -- | -- | |
| २. | भुईमुग | ३५० | ७००* | | *लांबलेल्या खरीपाचा रब्बीमधील दर |
| ३. | भाजीपाला व कांदा | ६०० | -- | -- | |
| ४. | भात | २४० | ४८०* | -- | *लांबलेल्या खरीपाचा रब्बीमधील दर |
| | **रब्बी** | | | | |
| ५. | भाजीपाला | - | १२०० | -- | |
| ६. | गहु | - | ४७० | -- | |
| ७. | इतर रब्बी | - | ३५० | - | |
| | **दुहंगामी** | | | | |
| ८. | मिरची, आले, तूर | १२० | २४० | ३६० | |
| ९. | कापूस | ४५० | ९०० | १३५० | |
| | **उन्हाळी** | | | | |
| १०. | भाजीपाला | - | - | १८०० | |
| ११. | भुईमुग | - | - | १०५० | |
| १२. | भात | - | - | ७२० | |
| | **बारमाही** | | | | |
| १३. | ऊस, केळी | १०५० | २१०० | ३१४० | एकूण ६२९० |
| १४. | फळबागा | ७९० | १५८० | २३५० | एकूण ४७२० |

## परिशिष्ट - २

### शेतीसाठी जलदर – खाजगी उपसा सिंचन योजना

रुपये / हेक्टर

| अ. क्र. | पाणी पुरविण्याचे स्त्रोत | ऊस/केळी | | फळबागा | | अन्य पिके | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रवाही | ठिबक | प्रवाही | ठिबक | खरीप | रब्बी | उन्हाळी |
| १ | **आश्वासित पाणी पुरवठा-** मोठे / मध्यम जलाशय / कालवा नसलेले साठवण तलाव | १५०० | ११५० | ११५० | ८६० | ८५ | १२० | २४० |
| २ | **वहन व्ययासह नियंत्रित पाणी पुरवठा-** धरणाच्या खालच्या बाजूचा नदीचा नियंत्रित भाग / कालव्यातून उपसा / जलाशयाचा आधार असलेला कोल्हापूर पध्दतीचा बंधारा / जलाशयातील अवजल | ११५० | ८६० | ८६० | ६५० | ४० | ६० | १२० |
| ३ | **अंशतः आश्वासित पाणी पुरवठा-** कालवा असलेला लहान जलाशय / जलाशयाचा आधार नसलेला कोल्हापूर पध्दतीचा बंधारा / कोणताही को. प. बंधारासुद्धा नसलेली अनियंत्रित नदी किंवा कोणताही बंधारा अथवा को. प. बंधारा नसलेला नदीचा लाभ क्षेत्रातील अनियंत्रित भाग | ७५० | ५८० | ५८० | ४३० | ३५ | ३५ | ६० |
| ४ | **पाणी वापर संस्थेने जलाशय बांधला असेल / पाणी वापर संस्थेने प्रमाणशीर खर्चाचा वाटा उचलला असेल.** पाणी वापरणा-या संस्थेने पायाभूत सुविधेच्या प्रमाणशीर खर्चाचा वाटा उचलला असेल अथवा धरण/ बंधारा / कच्चा बंधारा / कोल्हापूर पध्दतीचा बंधारा स्वखर्चाने बांधला असेल . | ५०० | ३८० | ३८० | २९० | -- | २० | २० |

टिप - वहनव्यय सेवा पुरवठादाराने सोसावयाचा आहे.

Maharashtra Water Resources
Regulatory Authority
(MWRRA)
महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

9th Floor, Centre-1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai - 400 005. Tel : 2215 2019 • Fax : 2215 3765

क्र: मजनिप्रा २०११/ठोकजलदर-आदेश/(५९)/३१५ दिनांक: ३० मे,२०११

## महाराष्ट्र राज्यातील औद्योगिक, घरगुती आणि कृषि-सिंचनाच्या वापरकर्त्यांसाठी घनमापन पध्दतीने पुरवावयाच्या पाण्याच्या ठोक दराचे पुनर्विलोकन आणि सुधारणा

१.० महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम २००५ (यापुढे 'अधिनियम' असे संबोधलेला ) मधील कलम ११ (प) नुसार दिलेल्या अधिकारात आणि ठोक जलदर प्रस्तावाच्या मसुद्यावर जलसंपदा विभागास (जसंवि) प्राप्त झालेल्या लाभधारक जनतेच्या अभिप्राय/सूचना व त्यातील प्रत्येक अभिप्राय/सूचनेवरील जलसंपदा विभागाचा प्रतिसाद विचारात घेऊन, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण ( यापुढे 'प्राधिकरण' असे संबोधलेले ), जलसंपदा विभागाने औद्योगिक, घरगुती व कृषिसिंचन वापरकर्त्यांस घनमापन पध्दतीने पुरवावयाच्या पाण्याचे ठोक दर खालीलप्रमाणे निर्धारित करीत आहे-

२.० हे दर सर्व प्रकारच्या जलसंपत्ती प्रकल्पांसाठी रब्बी २०१०-११ ते उन्हाळी २०१२-१३ या कालावधीसाठी अनुज्ञेय राहतील.

३.० **पार्श्वभूमी**

३.१ अधिनियमातील कलम ११ (घ) नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार प्राधिकरणाने जून २०१० मध्ये लाभार्थींच्या मतांची खात्री करुन ठोक जलदर निश्चितीकरिता (२०१०-११,२०११-१२ आणि २०१२-१३ या तीन सिंचन वर्षाकरिता अनुज्ञेय) अंतीम निकष निश्चित केले. प्राधिकरणाने त्यांच्या दि. ३/६/२०१० च्या पत्रानुसार हे अंतीम निकष जलसंपदा विभागाकडे पाठवून त्या निकषांनुसार जलदर प्रस्तावाचा मसुदा सादर करण्याच्या सूचना दिल्या. जलसंपदा विभागाने त्यांच्या दि. २९/१२/२०१० च्या पत्रान्वये रब्बी २०१०-११ ते उन्हाळी २०१२-१३ या कालावधीकरिता पाठविलेला दर प्रस्तावाचा मसुदा प्राधिकरणास प्राप्त झाला. प्राधिकरणाने , निकषाशी सुसंगत व वापरलेल्या आधार सामुग्रीची वैधता या दृष्टीने प्रस्तावाची तांत्रिक पडताळणी करुन दि.१०/१/२०११ च्या पत्रान्वये लाभधारकांबरोबर सल्लामसलतीसाठी प्रस्ताव ठीक असल्याचे जलसंपदा विभागास कळविले आणि त्याचबरोबर सल्लामसलतीबाबत, निकष निर्धारित करणे व ठोक वापरासाठीचे जलदर आदेश निर्गमित करणे यासाठीच्या विनियमाच्या मसुद्यास अनुसरुन [कलम ४(६)] सल्लामसलती संबंधाने उचित कार्यवाही करावी, असेही सुचविले.

३.२ या निदेशाच्या अनुपालनार्थ जलसंपदा विभागाने दि. १/२ मार्च २०११ च्या जिल्ह्यांतील मराठी वृत्तपत्रांमध्ये दराबाबतचा संक्षिप्त प्रस्ताव प्रसिध्द केला. याशिवाय संपूर्ण दर प्रस्ताव राज्यातील सर्व तालुका मुख्यालयी दि. २८/२/२०११ पर्यंत उपलब्ध करुन दि. ३१/३/२०११ पूर्वी ( ३० दिवसांचे मुदतीत ) लोकांकडून अभिप्राय/सूचना मागविल्या.

३.३ जलसंपदा विभागाने, लोकांच्या प्रतिसादासाठी ठरविलेला कालावधी संपुष्टात आल्यानंतर जलदर प्रस्तावाच्या मसुद्यांवर लोकांकडून प्राप्त झालेल्या प्रत्येक अभिप्रायांवर/सूचनांवर विभागाच्या अभिप्रायासह दिनांक १८ मे २०११ च्या पत्रान्वये प्राधिकरणाकडे पाठविल्या.

३.४ प्राधिकरणाने जलसंपदा विभागाचा जलदर प्रस्ताव आवश्यक त्या सुधारणा/अटींच्या अधीन राहून स्वीकृत केला. लोकांकडून प्राप्त अभिप्राय/सूचना, त्यावरील जलसंपदा विभागाचे म्हणणे व त्या प्रत्येक अभिप्राय व सूचना यावरील प्राधिकरणाचा निर्णय याबाबतची संकलित माहिती प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर स्वतंत्रपणे प्रसृत करण्यात येत आहे.

३.५ अंतीम निकषाच्या कलम ६.४ नुसार ठोक पाणी वापराच्या घनमापन दराबाबत हे आदेश प्राधिकरणाकडून निर्गमित करण्यात येत आहेत. प्राधिकरणाने, त्याच्या दिनांक ३०/५/२०११ च्या पत्राद्वारे जलसंपदा विभागास कृषी-सिंचनाचे क्षेत्राधारित दर निर्गमित करण्याबाबत, त्याच कलमातील तरतुदीला अनुसरुन निदेश दिले आहेत.

## ४.० ठोक पाणी वापराचे घनमापन दर

### ४.१ औद्योगिक वापर

४.१.१ पाणी पुरवठयाचे स्त्रोतनिहाय, ठोक पाणी वापरकर्त्यांकरिता, पाणी हे कच्चा माल म्हणून (उदा. शीतपेये) आणि प्रक्रियेद्वारे (उदा. तापमान कमी करणे, साधनसामुग्री स्वच्छ करणे इ.) वापरणाऱ्या अशा दोन औद्योगिक उपवर्गवारीनुसार, मूळ घनमापन दर खालीलप्रमाणे ठरविले आहेत.

**रु./१० घमी**

| अ. क्र. | पुरवठयाचा स्त्रोत | औद्योगिक पाणीवापर | |
|---|---|---|---|
| | | प्रक्रियाद्वारे | कच्चा माल |
| १. | **आश्वासित पाणी पुरवठा-**<br>मोठे, मध्यम जलाशय/कालवा नसलेले साठवण तलाव | ३२ | १६० |
| २. | **वहनव्ययासह नियंत्रित पाणी पुरवठा -**<br>धरणाच्या खालच्या बाजूचा नदीचा नियंत्रित भाग/ /कालव्यातून उपसा /जलाशयाचा आधार असलेला कोल्हापूर पध्दतीचा बंधारा/जलाशयातील अवजल | ६४ | ३२० |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | **अंशतः आश्वासित पाणी पुरवठा-**<br>कालवा असलेला लहान जलाशय/जलाशयाचा आधार नसलेला कोल्हापूर पध्दतीचा बंधारा/ कोणताही को.प. बंधारा नसलेली अनियंत्रित नदी किंवा कोणताही बंधारा अथवा को.प. बंधारा नसलेला नदीचा लाभक्षेत्रातील अनियंत्रित भाग | १६ | ८० |
| ४. | **पाणीवापर संस्थेने जलाशय बांधला असेल/पाणीवापर संस्थेने प्रमाणशीर खर्चाचा वाटा उचलला असेल** पाणी वापरणाऱ्या संस्थेने (ग्रामपंचायत, स्थानिक नागरी संस्था, महानगरपालिका व तत्सम संस्था) पायाभूत सुविधेच्या प्रमाणशीर खर्चाचा वाटा उचलला असेल अथवा धरण/ बंधारा/ कच्चा बंधारा/ कोल्हापूर पध्दतीचा बंधारा स्वखर्चाने बांधला असेल | १०.७ | ५३.५ |

टीपः १. वरील मूळ दर रब्बी हंगाम, नोव्हेंबर ते फेब्रुवारी या कालावधीसाठी ( कोकण व विदर्भ वगळून , जेथे तो हंगाम १५ नोव्हेंबर ते ३१ मार्चपर्यत असेल ) अनुज्ञेय राहतील. त्या अनुषंगाने खरीप हंगाम, जुलै ते ऑक्टोबर या कालावधीसाठी ( कोकण व विदर्भ वगळून, जेथे तो हंगाम १५ नोव्हेंबर पर्यंत लांबेल ) दर **मूळ दराच्या ५०%** राहतील आणि उन्हाळी हंगाम, १ मार्च ते ३० जून या कालावधीसाठी ( कोकण व विदर्भ वगळून, जेथे तो हंगाम १ एप्रिल ते ३० जून पर्यत असेल ) दर **मूळ दराच्या १५०%** राहतील.

२. औद्योगिक वापरातील करारनाम्यानुसार असणारा घरगुती पाण्याचा घटक उचित घरगुती दराने खाली परिच्छेद-४.२ मध्ये दिल्यानुसार आकारण्यात येईल.

४.१.२ **सूट/ सवलती / प्रोत्साहने**

(१) कृषि उद्योगासाठी ( कुक्कुटपालन, कॅनिंग, दुग्धव्यवसाय, ऊसावर प्रक्रिया ) अनुज्ञेय दराच्या ७५ % दर राहतील.

(२) जर एखादा उद्योग , पाण्याचा पुनर्वापर करुन (वापर किमान २५% ने कमी करुन) पुनर्वापराच्या सहाय्याने मागणी किमान ७५% वा त्यापेक्षा कमी करीत असेल तर करारनाम्यातील मागणीत झालेली घट, सेवापुरवठादार म्हणजेच कार्यकारी अभियंत्यापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्याने शहानिशा करण्याच्या अटीवर, अनुज्ञेय दराच्या ७५% दर अशा कमी झालेल्या मागणीस आकारण्यात येईल.

४.१.३ **दंड**

प्रत्येक उद्योगाने नैसर्गिक पाण्याच्या प्रवाहात सांडपाणी सोडण्यापूर्वी त्या पाण्यावर विहित प्रमाणकांची गुणवत्ता येईपर्यंत उचित प्रक्रिया करणे अपेक्षित आहे. जर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या विहित प्रमाणकांची गुणवत्ता येईपर्यंत

सांडपाण्यावर उचित प्रक्रिया केली नसेल तर अशा प्रकरणी अनुज्ञेय दराच्या दुप्पट दराने आकारणी करण्यात येईल. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून स्वतंत्रपणे करण्यात येत असलेल्या कार्यवाहीव्यतिरिक्त ही (दंडनीय) आकारणी असेल.

## ४.२ घरगुती वापर

४.२.१ पाणी पुरवठयाचे स्त्रोतानुसार ग्रामपंचायत, स्थानिक नागरी संस्था (नगरपालिका/ नगरपरिषदा ) आणि महानगरपालिका या तीन उपवर्गांकरिता घरगुती ठोक पाणी पुरवठयाचे घनमापन मूळ दर खालीलप्रमाणे निश्चित केले आहेत.

**रु./१० घमी**

| अ. क्र. | पुरवठयाचा स्त्रोत | घरगुती | | |
|---|---|---|---|---|
| | | ग्रामपंचायत | नगरपरिषद नगरपालिका | महानगरपालिका |
| १ | **आश्वासित पाणी पुरवठा-**<br>मोठे, मध्यम जलाशय/कालवा नसलेले साठवण तलाव | १.३२ | १.५८ | २.१० |
| २ | **वहनव्ययासह नियंत्रित पाणी पुरवठा-**<br>धरणाच्या खालच्या बाजूचा नदीचा नियंत्रित भाग/ कालव्यातून उपसा/जलाशयाचा आधार असलेला कोल्हापूर पध्दतीचा बंधारा/ जलाशयातील अवजल | २.६४ | ३.१५ | ४.२० |
| ३ | **अंशतः आश्वासित पाणी पुरवठा-**<br>कालवा असलेला लहान जलाशय/जलाशयाचा आधार नसलेला कोल्हापूर पध्दतीचा बंधारा/ कोणताही को.प. बंधारा नसलेली अनियंत्रित नदी किंवा कोणताही बंधारा अथवा को.प. बंधारा नसलेला नदीचा लाभक्षेत्रातील अनियंत्रित भाग | ०.६७ | ०.७९ | १.०५ |
| ४ | **पाणीवापर संस्थेने जलाशय बांधला असेल/पाणीवापर संस्थेने प्रमाणशीर खर्चाचा वाटा उचलला असेल**<br>पाणी वापरणाऱ्या संस्थेने (ग्रामपंचायत, स्थानिक नागरी संस्था, महानगरपालिका व तत्सम संस्था ) पायाभूत सुविधेच्या प्रमाणशीर खर्चाचा वाटा उचलला असेल अथवा धरण/बंधारा/कच्चा बंधारा/ कोल्हापूर पध्दतीचा बंधारा स्वखर्चाने बांधला असेल | ०.४४ | ०.५३ | ०.७० |

टीप: (१) तीनही हंगामांकरिता मूळ दर समान राहतील.

(२) घरगुती वापरापैकी करारनाम्यानुसार असणारा औद्योगिक वापराचा (वाणिज्यिक वापरासह) घटक विभक्त करुन उचित औद्योगिक दराने आकारणी करण्यात येईल.

४.२.२ **सूट/ सवलती / प्रोत्साहने**

जर महानगरपालिका / नगरपालिका / वापरकर्ता गट / कोणताही घरगुती ठोक पाणीवापरकर्ता सांडपाण्यावर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या विहित प्रमाणकापर्यंत प्रक्रिया करुन असे पाणी सिंचन/बगीचा करिता वापरण्यायोग्य करील तर अशा प्रकारचे प्रक्रियायुक्त सांडपाणी निर्माण करण्यासाठी वापरलेल्या पाण्याच्या परिमाणास अनुज्ञेय दराच्या ७५% दर लावण्यात येईल.

४.२.३ **दंड :**

(१) पेयजल पुरवठयाच्या प्रयोजनार्थ अवर्षण कालावधीत जलाशयातून करण्यात आलेल्या आरक्षणासाठी (प्रत्यक्ष वापर कमी असला तरी ) बाष्पीभवन व वहनव्ययासह एकूण परिमाणास पूर्ण आकारणी केली जाईल.

(२) हे ठोक जलदर आदेश निर्गमित झाल्यापासून २ वर्षाच्या आत महानगरपालिका/नगरपालिका आवश्यक क्षमतेची व विहित प्रमाणकापर्यंत गुणवत्ता येण्याच्या दृष्टीने सांडपाणी/दूषित जल यावर प्रक्रिया करण्यासाठी नवीन/अतिरिक्त प्रक्रिया केंद्रे ( STPs ) उभारण्याचा कृती कार्यक्रम आखून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व प्राधिकरण यांना सादर करतील. हे न केल्यास त्यानंतर अनुज्ञेय दराच्या दीडपट दराने आकारणी करण्यात येईल.

४.३. **<u>कृषि सिंचन ( घनमापक आकारणी )</u>**

४.३.१ सर्व प्रकारच्या जलसंपत्ती प्रकल्पांतील भात आणि अन्य पिकांसाठी ठोक पाणी पुरवठयाचे हंगामनिहाय घनमापन दर खालीलप्रमाणे निश्चित केले आहेत.

पैसे/घमी

| **हंगाम** | **भात पीक** | | **अन्य पिके** |
|---|---|---|---|
| | **विदर्भातील करारांतर्गत** | **अन्य प्रदेश** | |
| खरीप | २ | ४ | ३ |
| रब्बी | ४ | ८ | ६ |
| उन्हाळी | ८ | १२ | ९ |

४.३.२ निकषाच्या कलम ६.४ नुसार हंगामनिहाय, पीकनिहाय क्षेत्राधारित कृषिसिंचनाचे दर स्वतंत्रपणे निश्चित केले आहेत. याविषयीचे आदेश जलसंपदा विभागाकडून निर्गमित करण्यात येत आहेत. क्षेत्राधारित दरांमध्ये प्रामुख्याने जमीन धारणेवर आधारित खालीलप्रमाणे सवलती आहेत :-

| | |
|---|---|
| (१) २ हे. पेक्षा कमी भूधारक शेतकरी | ७५% अनुज्ञेय दर ऊस, केळी, फळबागांव्यतिरिक्त सर्व पिकांसाठी. |
| (२) ‍ः. पेक्षा कमी भूधारक शेतकरी : (अ) मा. पंतप्रधानांच्या पॅकेजमधील विदर्भातील जिल्हे आणि (ब) राज्याने जाहीर केलेला नक्षलग्रस्त भाग | ५०% अनुज्ञेय दर ऊस, केळी, फळबागांव्यतिरिक्त सर्व पिकांसाठी. |

४.३.३ अधिनियमातील तरतुदीनुसार, क्षेत्राधारित दरांमध्ये दंड म्हणून अधिनियम लागू झाल्यापासून १ वर्षानंतर (म्हणजे दि. ८/६/२००६ नंतर) जन्मलेल्या २ पेक्षा अधिक मुले असणाऱ्या शेतकऱ्यांस अनुज्ञेय दराच्या १.५ पट दर आकारण्यात येतील.

४.३.४ निकषांनुसार घनमापन दर काढताना, पाणीवापर संस्था स्थापन करण्यास प्रोत्साहन देण्याकरिता, दरामध्ये २५% सवलत आधीच देण्यात आली आहे. ज्या पाणीवापर संस्था परिच्छेद ४.३.२ मध्ये नमूद केलेल्या क्षेत्राधारित सवलती तसेच, परिच्छेद ४.३.३ मध्ये दिल्यानुसार त्यांच्या सभासदांना कुटुंबाच्या आकाराच्या अनुषंगाने दंड लावत असतील त्यांना भातपिक वगळता अन्य पिकांसाठी खालीलप्रमाणे कमी केलेले घनमापन दर अनुज्ञेय राहतील---

| | |
|---|---|
| खरीप | २.५ पैसे/घमी |
| रबी | ५.० पैसे/घमी |
| उन्हाळी | ७.५ पैसे/घमी. |

४.३.५ भातपिकाच्या क्षेत्रासाठी घनमापन दर काढताना अन्य पिकांच्या २५% च्या तुलनेत ५०% सवलत वरील परिच्छेद ४.३.२ मधील सवलतीचा विचार करुन दिलेली आहे.

४.३.६ वरील परिच्छेद ४.३.४ मधील सवलतीचे दर लागू होण्यास पात्र ठरण्यापूर्वी पाणीवापर संस्थांनी त्यांच्या सभासदांसाठी जलदर निश्चित करताना परि. ४.३.२ प्रमाणे त्यांच्या सभासदांना सवलती दिल्या आहेत आणि परि. ४.३.३ नुसार दंडनीय दर आकारले असल्याबाबतचे प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे.

४.३.७ (१) प्रकल्पाच्या प्रचालनाच्या प्रथम वर्षी कोणतेही जलदर आकारले जाणार नाहीत.

(२) हंगाम सुरु होण्यापूर्वी केलेल्या आगाऊ अदायगीस पाणीपट्टीत ५% सूट देण्यात येईल.

## ५.० बिगर सिंचन वापरकर्त्यांसाठी सर्वसाधारण तरतुदी :

(१) भविष्यातील करारनामे करताना जलसंपदा विभागाने अंतिम निकषाचे कलम १३.४ (ii) आणि (v) विचारात घ्यावे.

(२) करारातील नमूद केलेल्या विहित परिमाणाच्या ± १० % पेक्षा अधिक पाणी बिगर सिंचन प्रयोजनासाठी घेणाऱ्यास अनुज्ञेय दराच्या दीडपट दंडनीय दर लागू राहील.

## ६.० तीनही वर्गातील पाणी वापरकर्त्यांसाठी सर्वसाधारण तरतुदी:

(१) अनुमती दिलेल्या कालमर्यादेपेक्षा विलंबाने केलेल्या अदायगीस देयकाच्या रकमेच्या १% प्रतिमाह विलंब आकार वा त्याच्या भागास लावण्यात येईल.

(२) वरील सर्व दर स्थानिक उपकरा व्यतिरिक्त आहेत. शासनाकडून वेळोवेळी निश्चित केल्यानुसार स्थानिक उपकर सुध्दा देय असेल.

३०|५|११

**( सु.वि. सोडळ )**
**सचिव**

प्रत:

१. सचिव ( जसंप्र व विकास ), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
२. सचिव ( जसंव्य व लाक्षेवि ), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
३. सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
४. सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई
५. प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
६. प्रधान सचिव, जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
७. कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, सिंचन सेवा भवन, सिव्हील लाईन्स, नागपूर-४४०००१
८. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, सिंचन भवन, बारणे रोड, मंगळवार पेठ, पुणे-४११ ०११.
९. कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, पहिला मजला, सिंचन भवन, जालना रोड, औरंगाबाद ४३१००५
१०. कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, सिंचन भवन, आकाशवाणी चौक, जळगाव-४२५ ००१.
११. कार्यकारी संचालक, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, २ रा मजला, सिंचन कोपरी कॉलनी, बारा बंगला परिसर, ठाणे(पूर्व)-४००६०३.
१२. सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.



C:\Documents and Settings\Admin\My Documents\priya\my docs\P.R.Khire,A.Director\BWT ORDER 1052011.doc

१३.४ सर्वसाधारण (सर्व प्रवर्गांकरिता)

(एक) विहीत मुदतीनंतर पाणीपट्टी भरणा करण्यात झालेल्या विलंबासाठी दंडनीय दर १ टक्के प्रतिमहिना अथवा १२ टक्के प्रतिवर्ष प्रमाणे आकारण्यात येईल.

(दोन) हंगाम सुरू होण्यापूर्वी आगाऊ बील प्रदान केल्यास आकारणी मध्ये ५ टक्के सवलत शेतीकरीता देण्यात येईल.

(तीन) भविष्यकाळात बिगरसिंचन वापरासाठीच्या पाण्यासंबंधातील सर्व करार, मागणीची मापदंडानुसार आवश्यकता लक्षात घेऊन होतील. (पिण्याच्या पाण्यासाठी ग्रामीण व शहरी भागाच्या लि/दिन/डोई मापदंडानुसार आणि उद्योगांसाठी उद्योगप्रकारानुसार घ.मी./युनिट उत्पादनावर आधारीत).

(चार) बिगर सिचंन वापराच्या बाबत, करारनाम्यामध्ये विहित केलेल्या प्रमाणाच्या १० टक्के पेक्षा कमी अथवा जादा वापर केल्यास, जादा/कमी उचल केलेल्या पाण्याकरिता मंजूर असलेल्या दराच्या १.५ पटीने दंडनीय दर आकारण्यात येईल.

(पाच) जलसंपदा विभागाशी करारनामा करताना बिगरसिंचन पाणीपारकर्ते अंतिम पाणी मागणी प्रमाणे टप्प्याटप्याने पाणीवापर करण्याचे नियोजन नमूद करू शकतील. अंतिम पाणी मागणी प्रमाणे पुरवठा सुरू होईपर्यंत वर्षनिहाय खालील प्रमाणे आकारणी करण्यात येईल

अ) टप्प्यानुसार ठरवून घेतलेल्या प्रमाणात पाणीवापर असल्यास लागू दराने आकारणी

ब) टप्प्यानुसार ठरवून घेतलेल्या पाणीवापरापेक्षा ± १० पाणीवापर (अधिक/कमी) झाल्यास, फरकाच्या वापरास दंडनीय दर लागू दराच्या १.५ पट.

क) उर्वरित प्रमाणाकरिता म्हणजे अंतिम नियोजित पाणीवापर वजा टप्प्यानुसार नियोजित पाणीवापरा करीता, बांधिलकी / लेखबध्द आकार लागू दराच्या ५ टक्के वार्षिक प्रमाणे आकारण्यात येईल.

जलसंपदा विभाग त्या वर्षाकरिता शिल्लक राहणारे पाणी कोणत्याही प्रवर्गातील इतर पाणीवापर कर्त्यांना त्या वर्षीच्या कालावधीत देवू शकेल. तथापि सदर पाणीवापरकर्त्याला सदर पाणीवापराचा कोणताही हक्क प्रस्थापित होणार नाही.

## परिशिष्ट-२ ब

## महाराष्ट्र शासनाच्या मालकीच्या उपसा सिंचन योजनांकरिता उर्जा आकारासह प्रकल्पनिहाय जलदर निश्चित करणेसाठीची पध्दती

१. कृष्णा खो-यातील सन २००५-०६ पासून कार्यान्वित असलेल्या व वेगवेगळ्या उंची असलेल्या म्हैसाळ, ताकारी व सिना-म्हाडा या उपसा सिंचन योजनांपासून मिळालेल्या अनुभवावर आधारीत पध्दती विकसित केलेली आहे. प्रकल्प अधिका-यांनी या प्रत्येक योजनेच्या परीचालनाची प्रत्यक्षातील माहिती पुरविली आहे. प्राधिकरणाने वीज आकार, सिंचित क्षेत्र, दर हेक्टरी महसुल आकारणी यांचा तपशील असलेले एक नमुना वर्ष विचारात घेतले आहे. या माहितीवर आधारीत पाणी वापर संस्था नसलेल्या क्षेत्रा करीता खालील पध्दत पाणीवापर संस्था स्थापन होईपर्यंत विहित करण्यात आली आहे.

२. हंगामाच्या प्रारंभी प्रकल्प अधिकारी सिंचनाची संभाव्य मागणी व येणा-या वीज देयकांच्या आधारे लागू करावयाचे संभाव्य वीज आकार यांचा अंदाज घेतात. (i) वीज आकार व (ii) पीकवार सिंचन आकार (सध्या अस्तित्वात असलेले शासन मंजूर दर अधिक २० टक्के स्थानिक उपकर व अन्य किरकोळ उपकर/आकार) अंतर्भुत असलेला प्रती हेक्टरी प्रती पाणीपाळीचा दर निश्चित केला जाऊन त्यास संबंधित मुख्य अभियंत्यांची मंजुरी घेतली जाते. शेतक-यांना या दरांची माहिती देण्यात येते. (काही योजनांत या दरावर आधारीत आगाऊ रक्कमही स्विकारली जाते.)

३. प्रत्यक्ष जल दर ठरविण्याकरिता अनुसरावयाची कार्यपध्दती

- म.रा.वि.मं. च्या अधिका-यांकडून संबंधीत प्रकल्प अधिका-यांना, प्रत्यक्ष वीज वापरानुसार प्राप्त झालेल्या एकूण वीज आकाराच्या आधारे योजनानिहाय दर हेक्टरी सिंचनाचे वीजदर निश्चित केले जातात.
- राज्य शासनाने हंगामवार, पीकवार निश्चित केलेल्या दरहेक्टरी सिंचनाच्या दरानुसार (२० टक्के स्थानिक उपकरांसह) प्रत्यक्ष सिंचन क्षेत्र व पाणी पाळ्यांची संख्या या आधारे आकारणी केली जाते.

- प्रती हेक्टरी वीज आकारासह प्रती हेक्टरी पाणीदर आणि प्रती हेक्टरी २० टक्के स्थानिक उपकरांसह सिंचनाचे प्रती हेक्टरी दर यांच्या आधारे एकूण दर ठरविण्यात येऊन वसुली करण्यासाठी या दराचे रुपांतर प्रती हेक्टरी प्रती पाणीपाळी मध्ये करण्यात येते.

- योजना निरंतर चालू रहावी यासाठी, उपसा सिंचन योजनांखालील जास्तीत जास्त क्षेत्र सिंचनाखाली आणले गेले पाहिजे. जेणेकरून वापरदारांना दर हेक्टरी कमीतकमी वीज आकार लागू होऊ शकेल. सर्व पाणीवापरदारांकडून वीज आकाराची संपूर्ण वसुली होईल, हे ध्येय असले पाहिजे.

- शासनातर्फे चालविल्या जाणाऱ्या उपसा सिंचन योजनांसाठीचे पाणीदर योजना निहाय असावेत. म्हणून उपशाचा प्रकार व खर्ची पडणारी वीज लक्षात घेऊन प्रत्येक योजनेसाठी वेगळे दर ठरविले जातील.

लाभक्षेत्रात जशा आणि जेव्हा पाणीवापर संस्था स्थापन होतील तेव्हा घनमापन पध्दतीने पाणी पुरवठा करुन प्रवाही क्षेत्रांसाठी प्राधिकरणाने निश्चित केलेले घनमापनाचे दर व प्रत्यक्ष सिंचीत क्षेत्रानुसार यथाप्रमाण प्रती हेक्टरी वीज आकाराच्या आधारे पाणीदर पाणीवापर संस्थेस लावले जातील.

४. <u>पाणी उचलून तलावात / पाझर तलावात सोडणाऱ्या ज्या उपसासिंचन योजना शासनातर्फे चालविल्या जातात अशा उपसासिंचन योजनांच्या वीज आकाराची लाभधारकांकडून वसूली करण्यासाठीं अनुसरावयाची पध्दती.</u>

म.रा.वि.मं.च्या अधिकाऱ्यांकडून संबंधीत प्रकल्प अधिकाऱ्यांना, प्रत्यक्ष वीज वापरावर आधारीत प्राप्त झालेले एकूण वीज देयक व या तलावांमुळे सिंचनाचा लाभ मिळणारे एकूण क्षेत्र यांचे आधारे प्रति हेक्टरी सिंचनाचा वीज दर निर्धारित करण्यात यावा.

....................................